# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### पुणे (जि.पुणे) शहरातील डोंगरमाथा –डोंगरउतार बाबतचा निर्णय प्रलंबित असल्याबाबत

**(१) १४१२१ (२०-०९-२०२०). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे (जि.पुणे) महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचा विकास आराखडा मान्य होऊन ३ वर्षे झाली असतानाही अद्याप शहरातील डोंगरमाथा -डोंगरउतार बाबतचा निर्णय शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे जुन्या हद्दीतील १२०० हेक्टरहून अधिक जमिनीबाबत प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-१०-२०२३) :** (१), (२), (३) व (४) पुणे महानगरपालिकेच्या पुनर्प्रसिध्द आराखड्यातील सारभूत स्वरुपातील फेरबदलांना शासनाने दि.१७.०२.२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजुरी दिली आहे. तथापि यामधील ई.पी. क्र.१६९ - डोंगरमाथा - डोंगर उतार या प्रस्तावित फेरबदलाबाबतचा निर्णय शासनाने Kept in abeyance (म्हणजेच प्रलंबित) ठेवला आहे. या निर्णयामध्ये, पुणे महानगरपालिकेने डोंगर माथा - डोंगर उतार (Hill Top - Hill Slope) या वापर विभागाखालील जागांवर झालेला विकास दर्शवून त्यांसह गुगल प्रतिमा शासनास सादर करण्याबाबत नमूद केले आहे. त्यानुसार उक्त ई.पी.क्र.१६९ चे अनुषंगाने पुणे महानगरपालिकेने माहिती सादर केली असून, सद्यस्थितीत सदर ई.पी.क्र.१६९ बाबत प्रस्तावाची छाननी करुन ई.पी.क्र.१६९ चे प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत अंतिम निर्णय शासनस्तरावर संकल्पित आहे.

---

### मौजे चांदोरी, सायखेडा, करंजगाव, शिंगवे (ता.निफाड, जि.नाशिक) येथील गोदावरी नदीचे पाणी दुषित झाल्याबाबत

**(२) ३८३३२ (०९-०४-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदी नाशिक शहरातून वाहत असल्याने नाशिक महानगरपालिका व औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषित पाणी हे गोदावरी नदीपात्रात सोडले जात असल्याने तसेच नदीपात्रातील वाढलेल्या पानवेलीमुळे नदीचे पाणी दुषित होत असल्याने याबाबत उपाययोजना करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे चांदोरी, सायखेडा, करंजगाव, शिंगवे सह इतरही गावांच्या परीसरातील गोदावरी नदीमध्ये मोठ्या प्रमाणात पानवेली वाढलेल्या असल्याने नदीपात्रात दुषित पाणी साचून राहिल्याने नदीकाठच्या गावांना पाण्याच्या दुर्गंधीमुळे डेंगू, मलेरिया यासारख्या आजारांच्या प्रादुर्भावास सामोरे जावे लागत असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नाशिक महानगरपालिकेस दिनांक ३१/०८/२०२० रोजी कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, नाशिक यांना दिनांक २२/०१/२०२१ रोजी जल कायदा, १९७४ अंतर्गत निर्देश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग ३ च्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) नाशिक महानगरपालिकेचे गणेश वाडी पंपीग स्टेशन हे फक्त मलजलासाठी डिझाइन केलेले असल्याने पावसाळ्यात जेव्हा मलजल व पावसाळी पाणी एकत्र येते तेव्हा प्रवाह वाढल्यामुळे ते बॉक्स क्लव्हर्हट मधून काही प्रमाणत ओव्हर फ्लो होऊन नदीत मिसळते. तथापि, पावसाची तीव्रता कमी झाल्यानंतर बॉक्स क्लवर्हट मधून ओव्हर फ्लो पाणी बंद होते.

नाशिक महानगरपालिका हद्दीत गोदावरी नदी पात्रात वाढलेल्या पाणवेली नाशिक महानगरपालिकेमार्फत Trash Skimmer ने वेळोवेळी काढण्यात येतात.

जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत गोदावरी नदीलगतच्या ८ ग्रामपंचायतीपैकी ग्रामपंचायत,ओढा मधील २०० किलोमीटर प्रतिदिन, एकलहरे मधील ६५० किलोलिटर प्रतिदिन व गोवर्धन मधील १२५ किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचे मलनि:सारण प्रक्रिया केंद्र चे बांधकाम मे.हिंदुस्तान एरोनॉटिकल लि. ओझर यांच्या CSR निधीच्या माध्यमातून काम पुर्ण झालेले आहे.

तसेच संसारी ग्रामपंचायतीचा सांडपाणी व्यवस्थापनाच्या ३०० किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचा मलनि:सारण प्रक्रिया केंद्र प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील मिठी नदी प्रदूषण मुक्त करण्याबाबत

**(३) ४५३४४ (१७-०९-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या विविध भागातून वाहणाऱ्या मिठी नदी मागील ११ वर्षात अतिप्रदूषित झाल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालातून दिनांक ११ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्लास्टिक, विविध प्रकारचा कचरा आणि विविध ठिकाणच्या झोपडपट्ट्या, गृहसंकुलांमधून निघणारे सांडपाणी, मलजल तसेच कारखान्यांमधून सोडण्यात येणारी रसायने थेट मिठी नदीत मिसळत असल्याने ती प्रदूषित झाल्याचे अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मिठी नदीच्या स्वच्छतेवर दरवर्षी खर्च केला जात असतानाही नदीच्या प्रदुषणात वाढ होण्याची कारणे काय आहेत तसेच नदीच्या स्वच्छतेवर मागील १० वर्षांत किती कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कायमस्वरूपी उपाययोजना करून मिठी नदी प्रदूषण मुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) मिठी नदीच्या स्वच्छता व सध्याच्या परिस्थितीबाबत मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार मुंबई महानगरपालिकेमार्फत मिठी नदीतील प्रदुषण नियंत्रित करण्यासाठी माहे जानेवारी, २०१७ मध्ये सल्लागार मे.फ्रिशमन प्रभू यांची नेमणूक करण्यात आलेली होती. सल्लागाराने सादर केलेल्या तांत्रिक व व्यवहार्यता अहवालानुसार लघु व दीर्घ

मुदतीच्या उपयोजनांतर्गत कामे सुचविली आहेत. मिठी नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्पातील कामांचे ४ गट करण्यात आले आहे. आजपर्यंत मिठी नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्पातील गट क्र.१ गट क्र.२, गट क्र.४ मध्ये सुमारे रु २४० कोटी इतका निधी खर्च करण्यात आलेला असून, गट क्र.३ मधील कामांची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र आणि मुंबईतील नगरसेवकांकरीता महानगरपालिका**
**कायद्यांतर्गत प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत**

**(४) ४६२८९ (२५-०९-२०२२). श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महानगर पालिका कायद्यांतर्गत महाराष्ट्र आणि मुंबईमध्ये नगरसेवकांना नियमित प्रशिक्षण अनिवार्य असणे अशी तरतूद नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्रासह मुंबईमध्ये प्रत्येक ५ वर्षांनी होणाऱ्या महानगपलिकेच्या निवडणुकांमध्ये ६० ते ८० टक्के नगरसेवक नवीन किंवा पहिल्यांदा निवडून येत असल्याने तसेच ५० टक्के महिला आरक्षण अंतर्गत निवडून आलेल्या महिला नगरसेविकांचे प्रमाण देखील जास्त असल्याने महापालिकेचे कामकाज, महानगर पालिका कायदा, महापालिका अर्थसंकल्प शहरांतर्गत राबविण्यात विकासात्मक धोरण अश्या गोष्टी समजण्यासाठी त्यांना किमान २ ते ३ वर्ष लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अश्या प्रकारचे कामकाज समजून घेण्यासाठी नवनिर्वाचित नगरसेवकांना पद्धतशीर व परस्परसंवादी कार्यशाळेचे आयोजन गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केरळ राज्यात ज्याप्रमाणे तेथील नगरसेवकांना प्रशिक्षण देण्याकरीता स्थानिक प्रशासनाने नगरसेवकांसाठी व अधिकारी वर्गासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहेत त्याच धर्तीवर महाराष्ट्रात अशी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी कोणतीही तरतूद नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, महाराष्ट्र महानगर पालिका कायद्याच्या आधारे अश्या सक्तीचे प्रशिक्षण देण्याकरिता राज्य शासनाने कोणती तरतूद केली आहे वा करण्याचे योजिले आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१०-२०२३) :** (१) होय.
(२) नवनिर्वाचित नगरसेवकांना पालिका कायदा व अन्य प्रशासकीय बाबी समजण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.
(३), (४) व (५) सद्यस्थितीमध्ये नगरसेवकांना प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याबाबतची तरतूद नाही. परंतू, अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**विकास कपात नागरीकांचा सहभाग व्हावा यासाठी एक व्यासपीठ**
**क्षेत्र विकास यांचे आयोजन करणेबाबत**

**(५) ४६७८६ (१०-११-२०२२). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर पालिका कायदा १८८८ आणि महाराष्ट्र महानगर पालिका कायदा १९४९ अंतर्गत शहरांमध्ये क्षेत्रसभा (Area Sabha) स्थापनेची तरतूद आहे. त्या अनुषंगाने महापालिकेला क्षेत्रसभा स्थापन करण्याच्या कायद्यानुसार दुरुस्तीबाबत राज्य शासनाची अधिसूचना देखील आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्षेत्रसभा ह्या नागरिकांच्या सहभागितासाठी व तळागाळातील प्रश्नांवर चर्चा विमर्श करण्यासाठी एक व्यासपीठ तयार करते धरमशाला, कोची, गंगटोक, आयझॉल याठिकाणी अशा सभांमध्ये नागरिक सहभागी होऊन गरजेचे

सल्ले व सूचना देतात त्याच धर्तीवर महाराष्ट्रात असणाऱ्या २७ महानगर पालिकांमध्ये अशा सभांची स्थिति काय आहे किंवा अशा सभा आयोजित केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारचे सभा आयोजित न करण्याची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१०-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये क्षेत्रसभेची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महानगरपालिका कार्यपद्धती, विषयक, नियम व विनियमबाबत**

**(६) ४६७८८ (१०-११-२०२२). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र व मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार, नगरपालिका कार्यपद्धती नियमांद्वारे परिषद व समितीच्या बैठकीत रचनात्मक चर्चा व विचारविनिमय सुनिश्चित करण्यासाठी सभा घेण्याबाबतचे तपशील व कार्यपद्धती नमूद केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एमसीजीएमच्या सर्वपरिषद व समितीच्या बैठकीत एमसीजीएमचा सविस्तर महानगरपालिका कार्यपद्धती विषयक नियम व विनियम (Bye-Laws) अनुसरण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्रातील अन्य २६ नगरपालिकांमधील नगरपालिकांची कार्यपद्धती कोणत्या आधारावर केली जाते, त्या आधारे मनपा कार्यपद्धती नियम तयार व मंजूर केले आहेत काय,
(४) नसल्यास, २६ नगरपालिकांची सभा व सभेची कार्यवाही करण्यासाठी असे कोणते नियम आहेत तसेच महानगरपालिकेच्या कार्यपद्धती नियमांना मान्यता न मिळाल्यास अन्य २६ नगरपालिकांमध्ये योग्य चर्चा व विचारविनिमय करण्यासाठी राज्य शासन महानगरपालिका कार्यपद्धती नियमावलीचा मसुदा तयार करण्यास मान्यता देणार आहे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१०-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ४५७(२) अन्वये महानगरपालिका सभा कामकाज नियम केले जातात.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५५ मधील तरतुदींनुसार राज्यातील महानगरपालिकांच्या नियमांमध्ये त्या-त्या महानगरपालिकांच्या स्थानिक व तत्कालीन परिस्थिती नुसार अधिनियमातील या तरतुदीस अनुसरुन अतिरिक्त नियम करण्याची तरतूद असून, त्यानुसार काही महानगरपालिकांनी या सभांचे अतिरिक्त नियम केलेले आहेत. काही महानगरपालिकांचे सभा कामकाज नियम संक्षिप्त स्वरुपांचे आहेत तर काही महानगरपालिकांचे सभा कामकाज नियम विस्तृत स्वरुपांचे आहेत. महानगरपालिकांच्या सभा कामकाजाची नियमावली करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे ) येथील उल्हास नदीचे पाणी प्रदुषित झाल्याबाबत**

**(७) ५२४५३ (१९-०१-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश**

**चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका तसेच कुळगाव बदलापूर नगर परिषद क्षेत्रातून वाहणारी उल्हास नदी गोड आणि शुध्द पाण्याच्या प्रवाहासाठी ओळखली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हेंद्रेपाडा नाल्याचा मुख्य प्रवाह या नदीत सोडण्यात आला असून उल्हास नदीच्या पिण्याच्या पाण्यात विनापरवाना सांडपाणी सोडल्यामुळे पाणी दूषित होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हास नदीजवळ अवैध वाहने थांबविली जात असून ट्रक, टेंपो, रिक्षा, बाईक इत्यादी अवैध वाहने नदीत धुतल्यामुळे नदीचे प्रदुषण वाढल्याबाबत एका सामाजिक संस्थेने महानगरपालिका, पर्यावरण सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार उल्हास नदीचे पाणी प्रदूषणमुक्त होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी व कुळगाव – बदलापूर नगरपालिकेचे अधिकारी यांनी केलेल्या संयुक्त पाहणी करुन उल्हासनदीमध्ये अवैध वाहने धुतली जाणार नाहीत याबाबत ठोस उपाययोजना करण्याकरिता कुळगाव बदलापूर नगरपरिषदेला दि ०७/११/२०२२ रोजी अंतरिम आदेश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बूर (मुंबई) येथील मैत्रीपार्क, सायन- ट्राँम्बे रोड येथे मोतीबाग बंगल्याजवळील अनधिकृत गाळयांचे बांधकामावर कारवाई करण्याबाबत**

**(८) ५४९४८ (२७-०१-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील मैत्रीपार्क, सायन- ट्राँम्बे रोड येथे मोतीबाग बंगल्याजवळ अनधिकृत गाळयांचे बांधकाम झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास महानगरपालिकेच्या वतीने सदर ठिकाणचे अनधिकृत गाळे सन २०१० मध्ये मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे निष्कासित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी पुन्हा अनधिकृत गाळयांचे बांधकाम झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकामावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) चेंबूर (मुंबई) येथील मैत्रीपार्क, सायन- ट्राँम्बे रोड येथे मोतीबाग बंगल्याजवळ अनधिकृत गाळयांचे बांधकाम झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सदर ठिकाणचे गाळे सन २०१० मध्ये मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे निष्कासित करण्यात आल्याची कोणतीही नोंद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभिलेखावर उपलब्ध नाही.

(३) व (४) सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या गाळेधारकांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायती मधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(९) ५६५३१ (२४-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या आणि अ वर्ग नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांची परिषद दिनांक १० जानेवारी २०२३ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिषदेत महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतीमध्ये एकूण १ लाख ४४ हजार ३१३ मंजूर पदापैकी ५५ हजारपेक्षा अधिक पदे रिक्त असून ४० हजार पदे लवकरच भरण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यातील एकूण १९८३ पदे संचालनामार्फत व नगरपरिषद, नगरपंचायत स्तरावरील क आणि ड गटाची ३७२० पदांची भरती ३४ जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीमार्फत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पदांची भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१०-२०२३) :** (१) होय.
(२), (३) व (४) महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये एकुण २७४१७ पद भरती करण्याचे प्रस्तावित आहे. यापैकी, राज्यसंवर्गातील १७३५ पदांच्या भरतीकरिता नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच, महानगरपालिका स्तरावरील पदे संबंधीत महानगरपालिका व नगरपरिषद संवर्गातील कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रीया जिल्हाधिकारी स्तरावरुन करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे महापालिकेत आरोग्य कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(१०) ५६५७३ (२४-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे महापालिकेच्या आरोग्य विभागात विविध जागांवर पदभरती होणार असून या जागांवर राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना महापालिकेतील शासकीय सेवेत सामावून घ्यावे या मागणीसाठी आरोग्य कंत्राटी कर्मचाऱ्यांनी धुळे येथे आंदोलन केले असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणी लक्षात घेता धुळे महापालिकेत आरोग्य कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासनाकडील दि. १४.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विविध संवर्गातील एकूण १२६ (गट अ, ब, क, व ड) ही रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत आस्थापना खर्चाची अट शिथील केलेली आहे. सदर पदांमध्ये आरोग्य विभागातील एकूण ५ पदांचा समावेश आहे.
तथापि, सदरचे १२६ पदे वगळता इतर संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी आस्थापना खर्चाची मर्यादा ३५ टक्के केलेली आहे.
धुळे महानगरपालिकेचा सन २०२२-२३ चा आर्थिक वर्षाचा आस्थापना खर्च ४८.९२ टक्के आहे. सदरचा आस्थापना खर्च ३५ टक्केपेक्षा जास्त असल्यामुळे एन.यु.एच.एम. अंतर्गत मानधनावरील कर्मचाऱ्यांना कायम मंजूर व रिक्त पदावर सेवेत सामावून घेणे शक्य होणार नाही, असे धुळे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा शहराच्या प्रारूप विकास रस्त्याची अधिसूचना रद्द करण्याबाबत

**(११) ५७२३१ (२४-०४-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) शहराच्या प्रारूप विकास रस्त्याची अधिसूचना रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे लेखी पत्राद्वारे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी अधिसूचना रद्द करणेबाबत त्वरीत बैठक आयोजित करण्याबाबत आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत बैठक आयोजित करण्यात येऊन अधिसूचना रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
मा.आ.श्री.समाधान अवताडे, यांनी दि.०९.१२.२०२२ रोजीच्या निवेदनाद्वारे मंगळवेढा नगरपरिषदेच्या प्रारुप विकास योजनेची अधिसूचना रद्द होण्याबाबत आदेश व्हावेत अशी विनंती मा.मुख्यमंत्री महोदयांना केली आहे. सदर निवेदनावर मा.मुख्यमंत्री महोदय यांनी "तपासून सादर करावेत" अशा सुचना दिलेल्या आहेत.
(२) हे खरे नाही.
तथापि, सदर दि.०९.१२.२०२२ रोजीच्या निवेदनावर शासनाने संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे व मुख्याधिकारी, मंगळवेढा नगरपरिषद यांचा दि.१३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागणी केलेली आहे.
(३) मंगळवेढा नगरपरिषदेची दुसरी सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.१ ते ७ डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिध्द झालेली आहे.
सदर प्रारुप विकास योजनेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या सर्व हरकती/सूचनांच्या अनुषंगाने मंगळवेढा नगरपरिषदेकडे प्राप्त सूचना/हरकतींबाबत कलम २७(२) अन्वये गठित केलेल्या नियोजन समितीने सर्व संबंधितांना सुनावणी देऊन त्यांचा अहवाल नियोजन प्राधिकरणास सादर केलेला आहे.

मंगळवेढा नगरपरिषदेने नियोजन समितीच्या उक्त अहवालावर ठराव क्र.१३८, दि.०९.०५.२०२३ अन्वये निर्णय घेऊन सदर प्रारुप विकास योजनेमध्ये योग्य ते बदल करुन फेरबदलांची सूची महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.२२ ते २८ जून, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. उपरोक्त प्रमाणे सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन सदर प्रारुप विकास योजना कलम ३० नुसार नगरपरिषदेने पत्र क्र.९१३, दि.०१.०३.२०२३ अन्वये शासनास मंजूरीसाठी सादर केलेली आहे.

विकास योजना प्रसिद्ध झाल्यानंतर ती रद्द करण्यासंदर्भात अधिनियमातील कलम २६ ते ३० मध्ये तरतुद नाही. तथापी, मा.आ.श्री.समाधान अवताडे, यांचे दि.०९.१२.२०२२ रोजीच्या निवेदनामधील हरकती व सूचनांचा संचालनालयाच्या स्तरावर तसेच सदर प्रारुप विकास योजनेस कलम ३१(१)अन्वये अंतिम मंजुरी देताना, शासनस्तरावर देखील विचार करणेत येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील महत्त्वकांक्षी उजनी सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम थांबविल्याबाबत**

**(१२) ५७९७४ (२४-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील उजनी सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम थांबविण्याचे आदेश तत्कालीन सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या सीईओने दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उजनी सोलापूर समांतर जल वाहिनीचे काम ठप्प झाल्याने सोलापूर शहराच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या परवानगीशिवाय तसेच स्वतःच्या अधिकार कक्षेत तत्कालीन सीईओ यांनी जलवाहिनीचे काम थांबवण्याचे आदेश दिल्याप्रकरणी पालकमंत्री महोदयांनी त्यांना नोटीस बजावण्याची सूचना दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनी घालणे या कामाचे कार्यारंभ आदेश दि.२४.१०.२०२२ रोजी तत्कालीन सीईओ यांनी दिले. सदरचा कार्यारंभ आदेश देणेबाबत ३१ व्या स्मार्ट सिटी संचालक बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला होता.सदर बैठकीचे इतिवृत्तांत मा.चेअरमन यांचे स्वाक्षरी होणे अगोदर तत्कालीन सीईओ यांनी वरील कामाचा कार्यारंभ आदेश दिला असला कारणाने दि.२४.११.२०२२ रोजी सदरचे काम थांबविण्याचे आदेश तत्कालीन सीईओ यांच्या स्तरावर देण्यात आले.

(२) सध्या सोलापूर शहरास पाणी पुरवठा औझ बंधारा, एकरुख तलाव व उजनी धरण या ३ स्त्रोत मधून होतो. या ३ स्त्रोतमधून सोलापूर शहरामधील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) व (४) तत्कालीन सीईओ यांनी जलवाहिनीचे काम थांबवण्याचे आदेश दिल्याप्रकरणी पालकमंत्री महोदयांनी त्यांना नोटीस बजावणची सूचना दिली होती. दि.०७.०७.२०२२ रोजी पोचमपाड आणि एससीडीसीएल यांनी संयुक्तपणे लवाद मिटवण्याच्या अटी व शर्ती मा.लवाद यांच्याकडे सादर केल्या व त्यानुसार मा.लवादांनी आदेश पारित केला. सदर अटी व शर्तीना अधिन राहून सद्य:स्थितीत पोचमपाड कन्स्ट्रक्शन कंपनीला दिनांक ०१/०६/२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निळवणे (ता.खेड जि.रत्नगिरी) गावातील १२ घरांना पुनर्वसन यादीतून वगळण्यात आल्याबाबत

**(१३) ५८०२६ (०९-०५-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निळवणे (ता.खेड जि.रत्नागिरी) गावातील ३२ घरांचे माहे जुलै, २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये पुनर्वसन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ३२ घरांपैकी फक्त २० घराचेच पुनर्वसन यादीत समावेश करुन उर्वरित १२ घरांना पुनर्वसन यादीतून वगळण्यात आल्याची माहिती खेड तहसिलदार यांनी दिली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, १२ घरांना पुनर्वसन यादीतून वगळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने १२ घरांचे तात्काळ पुनर्वसन करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१२-१०-२०२३) :** (१) सन २००५ चे अतिवृष्टीमध्ये मौजे निळवणे (ता. खेड जि. रत्नागिरी) येथील ३२ घरांचे नुकसान झाले होते. त्यापैकी २० घरांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

(२) होय, ही बाब खरी आहे.

(३) व (४) सन २००५ चे अतिवृष्टीमुळे खेड तालुक्यातील मौजे निळवणे येथील एकूण ३२ घरे बाधित झाली होती. त्यापैकी २० घरांचे पुनर्वसन करण्यात आले असून सदर २० घरांचे पुनर्वसनासाठी श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास यांचेकडील प्रतिघर रु.६०,०००/- याप्रमाणे रु.१२,००,०००/- निधी तहसीलदार खेड यांना वितरीत करणेत आला आहे. उर्वरित १२ आपदग्रस्तांनी शासनाकडून जागा संपादित होणेपूर्वी गावातील अन्य जमीन मालकांकडून खाजगी वाटाघाटीने जागा उपलब्ध करून स्वतः नव्याने घरे बांधली असल्यामुळे त्यांची नावे पुनर्वसन प्रस्तावात समाविष्ट करणेत आली नाहीत. सदर १२ घरांना दि. ०९/०१/२००६ चे शासन निर्णयान्वये बाधित घरांचे पुनर्बांधणीसाठी प्रतिघर रू. ४०,०००/- मात्र अनुदान तहसीलदार खेड यांचेकडून वितरीत करण्यात आले आहे. उर्वरित मुख्यमंत्री सहायता निधीमधून रु.५०,०००/-प्रमाणे रु.६,००,०००/- निधी मिळणेबाबत विनंती केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांनी दि.०७/०७/२००९ दि. ३१/०७/२००९ अन्वये शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. तथापि शासनाच्या दि.२७/०१/२०२२ च्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या मुद्यांसदर्भात जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी दि.३१/१०/२०२२ च्या पत्रान्वये स्वेच्छा पुनर्वसन केलेल्या १२ आपत्तीग्रस्तांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून रु.५०,०००/- किंवा सिध्दीविनायक गणपती मंदीर न्यास कडून रु.६०,०००/- प्रतिघर प्रमाणे निधी मिळणेबाबत विनंती केली आहे. तथापि २० घरांचे पुनर्वसनासाठी श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास यांचेकडून निधी उपलब्ध झाला असल्याने उर्वरित १२ आपद्ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठीही श्री सिद्धिविनायक गणपती मंदीर न्यास यांच्याकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना दि. ०९/१०/२००९ चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री सिद्धिविनायक गणपती मंदीर न्यास यांच्याकडे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडून निधी मागणी करण्यात आली. तसेच लोकप्रतिनिधींच्या दि.१९/०३/२०२३ च्या निवेदनानुसार उर्वरित १२ घरांच्या पुनर्वसनासाठी श्री.सिद्धिविनायक गणपती मंदीर न्यास, मुंबई यांच्याकडून निधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी विधि व न्याय विभागास दि.१५.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्रत्येकी पात्र पुरपिडीत शेतकरी कुटुंबाना ५०० चौरस फूट क्षेत्रफळात बदल करुन १५०० चौरस फुट क्षेत्रफळ जागा देण्याबाबत

**(१४) ५८१५५ (२४-०४-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येकी पात्र पुरपिडीत शेतकरी कुटुंबाना पुनर्वसित ठिकाणामध्ये केवळ ५०० चौरस फुट क्षेत्रफळ शासन

निर्णय क्र.एफएलडी-२०१९/प्र.क्र.१२९/र-१२, दि.१४ ऑक्टोबर, २०२२ मधील परिच्छेद क्रमांक (क) मध्ये अनुज्ञेय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासन निर्णयात पुनर्वसित ठिकाणामध्ये अनुज्ञेय असलेल्या भूखंड / घर यामध्ये दर्शविण्यात आलेल्या किमान स्वतंत्र ५०० चौरस फूट क्षेत्रफळात बदल करुन १५०० चौरस फुट क्षेत्रफळ जागा देण्यात यावी आणि त्याप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात यावेत, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (२०-०९-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मा.लोकप्रतिनिधीच्या मागणीच्या अनुषंगाने शासन निर्णय दि.१४/१०/२०२२ मध्ये तरतूद विहीत असल्याने त्याबाबत मा. लोकप्रतिनिधींना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरातील कर्नाक ब्रीज तसेच हॅकॉक ब्रिजचे बांधकामाच्या निविदा प्रक्रियेबाबत**

**(१५) ५८६२० (२१-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील कर्नाक ब्रीज तसेच हॅकॉक ब्रिजचे बांधकाम पाडणे (Demolition) तसेच नव्याने ब्रीज बांधकाम (Reconstruction) करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून निविदा प्रकिया राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्नाक ब्रिजच्या कामांसाठी मेसर्स इन्फ्राबिल्ड प्रा. लि. तसेच हॅकॉक ब्रिजचे कामांसाठी मेसर्स साई प्रोजेक्ट्स (मुंबई) प्रा.लि. यांना सदर कामाची निविदा देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांमध्ये बिलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कॅग या संस्थेमार्फत सदर कामामध्ये अनियमिततेचे ताशेरे ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कॅग या संस्थेमार्फत संबाधित ठेकेदारांवर ठेवण्यात आलेल्या अनियमिततेच्या ताशेऱ्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) कर्नाक पुलाच्या कामासाठी मे. ए.बी. इन्फ्राबिल्ड प्रा.लि. व हॅकॉक पुलासाठी मे. साई (प्रोजेक्ट्स) मुंबई यांना निविदा व कार्यादेश देण्यात आले आहेत.

(३) सदर कामांमध्ये खालील कारणास्तव विलंब झाला आहे :-

हॅकॉक पूल - सदर कामामध्ये बाधित होणाऱ्या म्हाडाच्या इमारतीचे निष्कासन न झाल्यामुळे पुलाची नियोजीत आराखड्यामध्ये तसेच संकल्पचित्रात बदल केला आहे.तसेच कोरोना प्रादुर्भावामुळे बहुतांश कालावधी वाया गेला आहे. रेल्वे प्राधिकरणाने संरचनात्मक आराखड्यामध्ये सुचविलेला बदल व पुल बांधणीमध्ये बाधित होणाऱ्या वीज दुरध्वनी व इतर वाहिन्या वेळेत स्थलांतरीत न केल्यामुळे विलंब झाला आहे

कर्नाक पूल- रेल्वे प्राधिकरणाने प्रस्तावित संरचनात्मक आराखड्यामध्ये बदल सुचविला आहे.व पोलिस वाहतूक विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र ऑगस्ट २०२२ मध्ये प्राप्त झाल्यानंतर पूल निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे.या कारणामुळे विलंब झाला आहे.

(४) लेखापरिक्षणामध्ये कॅग संस्थेमार्फत संबधीत ठेकेदारांवर कोणत्याही प्रकारचे अनियमततेचे शेरे नसल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कोणतीही कार्यवाही केली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या अर्धवेळ शिक्षकांना महापालिकेच्या सेवेत घेणेबाबत

**(१६) ५९०६९ (२४-०४-२०२३). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील महानगरपालिका शिक्षण विभागाच्या के.जी.वर्गावर १५ वर्षापासून अर्धवेळ शिक्षक म्हणून १७ शिक्षक कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शिक्षकांना पालिका शिक्षकांप्रमाणे पूर्णवेळ सेवेत सामावून महानगरपालिकेच्या मुंबई पब्लिक स्कूलमध्ये रुजू करावे अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई पब्लिक स्कूल छोटा शिशू व मोठा शिशू वर्गावर कार्यरत असलेल्या अर्धवेळ/अंशकालीन शिक्षकांची नेमणूक ही कंत्राटी असून पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची प्रति महिना रु. ५०००/- ठोक वेतनावर असेल, सन २००७-०८ मध्ये मुंबई पब्लिक स्कूल माध्यम सुरु करण्यात आले असल्याने इयत्ता १ ली करिता नियुक्त प्रशिक्षित शिक्षकांचे नियमन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (सेवा) नियम १९८९ चे नियम आणि सेवा संचलन सहित बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (संचालन) नियम १९९९ च्या सेवा शर्ती आणि नियम अन्वये होईल, तसेच छोटा शिशू (ज्युनिअर के.जी.) व मोठा शिशू (सिनिअर के.जी.) करीता पार्ट टाईम शिक्षकांचे नियमन या नियमानुसार होणार नाही असे जाहिरातीत स्पष्ट नमूद करण्यात आले होते.
तथापि अर्धवेळ/अंशकालीन शिक्षकांची पदे शिक्षण विभागाच्या आस्थापना अनुसूचीवर नसल्याने व हमीपत्रात सदर अर्धवेळ/अंशकालीन शिक्षकांनी अटी व शर्ती मान्य केलेल्या असल्याने त्यांना महानगरपालिका शिक्षकांप्रमाणे सेवेत कायम करणे शक्य नाही.
सद्य:स्थितीत मुंबई पब्लिक स्कूल वर्गावर कार्यरत असलेल्या छोटा व मोठा शिशू अंशकालीन शिक्षकांचे मानधन रु. ८०००/- इतके करण्याकरिता प्रस्ताविण्यात आले आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नगर पंचायत कुरखेडा व कोरची (जि.गडचिरोली) येथील मुख्याधिकाऱ्याचे रिक्त पद भरण्याबाबत

**(१७) ५९२८३ (०७-०६-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर पंचायत कुरखेडा व कोरची (जि.गडचिरोली) येथील मुख्याधिकाऱ्याचे पद मागील वर्षभरापासून रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१०-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) शासन आदेश दिनांक २२.०८.२०२३ अन्वये कुरखेडा नगरपंचायतीमध्ये मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेतर्फे पूर्व आणि पश्चिम उपनगरातील आरोग्य सेवेला बळकटी देण्याकरीता निधीची तरतूद करण्याबाबत**

**(१८) ६१५२१ (२४-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेतर्फे पूर्व आणि पश्चिम उपनगरातील आरोग्य सेवेला बळकटी मिळावी याकरिता भांडूप येथे ३६० खाटांचे मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यात येणार असून तर गोरेगांव येथील सिध्दार्थ रुग्णालयाचा पुनर्विकास आणि ओशिवरा येथे १५२ खाटांचे प्रसूतीगृह उभारले जाणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपनगरातील आरोग्य सेवेला बळकटी देण्याकरिता किती निधीची तरतुद करण्यात आली आहे वा येत आहे, तसेच सदर कामाचे सर्वसाधारण स्वरुप काय आह,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने माहिती घेऊन कोणती कार्यवाही केली आहे व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
भांडुप मल्टीस्पेशालिटी रुग्णालय बांधण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २९.०८.२०२२ रोजी कार्यादेश देण्यात आला असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.
सिध्दार्थ रुग्णालयाच्या पुनर्विकासाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १०.०४.२०२३ रोजी कार्यादेश देण्यात आला असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.
ओशिवरा प्रसुतीगृहाच्या पुनर्विकासाकरिता दिनांक २२.१२.२०२२ रोजी स्वीकृतीपत्र दिले असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.
(२) व (३) मुंबई उपनगरातील आरोग्य सेवेला बळकटी देण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-
**भांडुप मल्टीस्पेशालिटी रुग्णालय**
सदर रुग्णालय प्रकल्पास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रु. ७६९.१२ कोटी इतक्या रकमेचा निधी मंजूर करण्यात आला आहे.
सदर रुग्णालय प्रकल्पात एकूण ३६० रुग्णशय्या आहेत. त्यात १४० अतिविशेष रुग्णशय्या प्रस्तावित आहेत.
अतिविशेष विभागात पिडीयाट्रिक सर्जरी, न्युरोलॉजी व सर्जरी, गॅस्ट्रोएंटेरोलॉजी व सर्जरी, ऑकोहिमॅटोलॉजी व सर्जरी यांचा समावेश आहे. तसेच सीटी स्कॅन, एम.आर.आय. मॅमोग्राफी इत्यादी अत्याधुनिक निदान सेवा, रक्तघटकांसह रक्तपेढी व अत्याधुनिक प्रयोगशाळा यांच्या समावेश आहे.
तसेच ६ मॉड्युलर शस्त्रक्रियागारासहीत एकूण १३ शस्त्रक्रियागार इत्यादी बाबी प्रस्तावित आहेत.
सद्य:स्थितीत पायाभरणीचे काम सुरु असून, सदर बांधकाम माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये पूर्ण होईल.
**सिध्दार्थ रुग्णालय, गोरेगांव (पश्चिम)**
सदर रुग्णालय प्रकल्पास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रु. ४०५.६२ कोटी इतक्या रकमेचा निधी मंजूर करण्यात आला आहे.
सदर रुग्णालय प्रकल्पात एकूण ३०६ रुग्णशय्या आहेत. त्यात ३१ अतिविशेष रुग्णशय्या प्रस्तावित आहेत.

अतिविशेष विभागात कार्डीयोलॉली, युरोसर्जरी, एक्युट डायलिसीस यांचा समावेश आहे. तसेच सीटी स्कॅन, एम.आर.आय. मॅमोग्राफी इत्यादी अत्याधुनिक निदान सेवा, रक्तघटकांसह रक्तपेढी व अत्याधुनिक प्रयोगशाळा यांच्या समावेश आहे.

१ कॅथलॅब व ३ मॉड्युलर शस्त्रक्रियागारासहित एकूण ११ शस्त्रक्रियागार इत्यादी बाबी प्रस्तावित आहेत.

सद्य:स्थितीत पायाभरणीचे काम सुरु असूर, सदर बांधकाम माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये पूर्ण होईल.

**ओशिवरा प्रसुतीगृह**

ओशिवरा प्रसुतीगृहाच्या पुनर्विकासासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात रु. ९.५ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

ओशिवरा गाव परिसरातील एका भूखंडावर १५२ खाटांचे प्रसुतीगृह उभारले जाणार आहे. १३,५०५.१५ चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्रफळ असणारे हे प्रसुतीगृह तळघर, तळमजला आणि त्यावरील ११ मजले यानुसार एकूण १३ मजल्यांचे असणार आहे.

या प्रसुतीगृहात प्रसूतीकक्ष, प्रसूति-पूर्व व प्रसूति-पश्चात कक्ष, स्त्रीरोग व कुटुंब कल्याण विभाग, कर्करोग तपासणी व उपचार विभाग, आयसीयू, एनआयसीयू, शस्त्रक्रियागृह आदी सुविधा असणार आहेत.

मूल नसलेल्या जोडप्यांसाठी अत्याधुनिक तपासणी व उपचारांची सुविधा असणारे आयव्हीएफ क्लिनिक, ब्लड बँक, मेडिकल वॉर्ड, एनआयसीयू, एमआयसीयू, मिल्कबँक इत्यादी सुविधा देखील असणार आहेत.

त्याचबरोबर वैद्यकीय निदानासाठी रक्त तपासणी सुविधा, सोनोग्राफी, सिटीस्कॅन, अल्ट्रासाऊंड, डायलिसिस या सुविधाही सदर प्रसुतीगृहात असणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामांना दिलेली स्थगिती उठविणेबाबत**

**(१९) ६२२६४ (११-०५-२०२३). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोईसुविधाअंतर्गत विकास कामांना शासनाने (नगरविकास विभागाने नवि-१६) रुपये १० कोटीच्या रक्कमेस दि.९ एप्रिल, २०२२ रोजी मंजुरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास कामांना निधी उपलब्ध करुन देण्याऐवजी शासनाने त्या कामांना दि. ६ जुलै, २०२२ रोजी अचानकपणे स्थगिती दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनतेच्या सोईसुविधांच्या दृष्टीने सदरची कामे तातडीने पुर्ण होऊन त्याचा जनतेला लाभ मिळणे गरजेचे असल्याने सदर कामांना शासनाने दिलेली स्थगिती उठवून त्यासाठी निधी उपलब्ध देण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याप्रकरणी शासनाने दिलेली स्थगिती उठवून कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अहमदनगर महानगरपालिके करीता दि. ११.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णान्वये रु. १०.०० कोटीच्या कामांना कामांस दिलेली स्थगिती दि. २१ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयात उठविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चोपडा मतदार संघातील (जि.जळगांव) विविध गावांमध्ये बौध्दविहार बांधण्यासाठी दलितवस्ती योजनेंतर्गत निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(२०) ६२४२४ (२५-०४-२०२३). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा (जि.जळगांव) तालुक्यातील विविध गावांमध्ये बौध्दविहार बांधण्यासाठी दलितवस्ती योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२२मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे,
(२) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत शासन निर्णय, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयान्वये रुपये ४.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील अंधेरी (पूर्व) येथील साईवाडी येथील रस्त्याकरिता बाधित होणाऱ्या झोपडयांचे पुनर्वसन तसेच रस्त्यांचे काम सुरु करण्याबाबत**

**(२१) ६३३३७ (१२-०५-२०२३). श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अंधेरी (पूर्व) येथील साईवाडी येथील आय.सी.आय. टॉवर शेजारील रस्ता तसेच साईस्नेहा एस.आर.ए. सोसायटीपुढील रस्ता ते सहा रोड शिवाजी चौक पर्यतच्या रस्त्यांचे रुंदीकरणाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त रस्त्यामधील नगर भू.क्र.४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२ मौजे विलेपार्ले मधील १८.३० मी.रुंदीचा डीपी रोड करिता जमीन अधिग्रहण करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेऊन या रस्त्याकरिता बाधित होणाऱ्या झोपडयांचे पुनर्वसन करण्याबाबत तसेच रस्त्यांचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) अंधेरी (पूर्व) साईवाडी येथील एन.एस. फडके मार्ग ते सहार रोडवरील शिवाजी चौक पर्यंतचा रस्ता विकास नियोजन नियंत्रण नियमावली १९९१ व विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली २०३४ नुसार प्रस्तावित १८.३० मी. चा विकास नियोजित रस्ता आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागाच्या मंजूर पुनर्रचित विकास आराखडा २०३४ नुसार न.भू.क्र. ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२ मौजे विलेपार्ले हे भूखंड अंशत: १८.३० मी. रुंद विकास नियोजन रस्त्याने बाधीत असून, सदर जमीन अतिक्रमित / भारग्रस्त आहे.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बॉटलनेक रिमुव्हल (Bottleneck removal) मधील मार्गदर्शक तत्वानुसार रस्त्याचे विकासाचे काम करण्यात येणार आहे. तसेच, रस्त्याच्या विकासासाठीची जमीन अधिग्रहीत करण्यात येणार आहे.

(३) सदर रस्ता पूर्णपणे प्रस्तावित १८.३० मी. रुंदीचा विकास नियोजित रस्ता असून सदर रस्त्याचा सर्वेक्षण नकाशा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागामार्फत करण्यात आला आहे व त्याप्रमाणे बाधीतांची पात्रता निश्चित करण्याचे प्रस्ताविले आहे.

सदर १८.३० मी. रुंदीच्या रस्त्यासाठी आवश्यक असलेली जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आल्यानंतर रस्त्याच्या बांधकामाबाबतची पुढील कार्यवाही तातडीने करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंठा (जि.जालना) येथे सामाजिक न्याय विभागामार्फत उभारण्यात आलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहाचा खाजगी इमारतीकरीता वापर केल्याबाबत

**(२२) ६३३३८ (२५-०४-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंठा (जि.जालना) येथे सामाजिक न्याय विभागामार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वसतीगृहाचा वापर मागासवर्गीय मुलींच्या वास्तव्यासाठी न करता मागासवर्गीय मुलीना खाजगी भाड्याच्या इमारतीत वास्तव्यास ठेवून शासनाचे आर्थिक नुकसान करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार जाणीवपूर्वक खाजगी इमारतीचे भाडे रक्कम अदा करून शासनाचे नुकसान करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यावर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-१०-२०२३) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकाशाळेत मुलांना पाणी पिण्याची आठवण करुन देण्यासाठी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकाची अंमलबजावणी केली नसल्याबाबत

**(२३) ६३३६४ (१२-०५-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये सन २०२०-२१ च्या शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पात शाळेत मुलांना पाणी पिण्याची आठवण करुन देण्यासाठी तीन वेळा घंटा वाजवण्याचे परिपत्रक प्रसिध्द करण्यात आले असूनही सदर निर्णयाची अंमलबजावणी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सुरु झालेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केरळच्या धर्तीवर शाळकरी विद्यार्थ्यांना आरोग्याच्या दृष्टीने गरजेचे असल्याने सदर निर्णयाची अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याने त्याबाबत महानगरपालिकेत अद्याप उदासीनता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याकरिता शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये पाणी पिण्याची आठवण करुन देण्याबाबत दिनांक १२.०१.२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये प्रत्येक अधिवेशनामध्ये मधली सुट्टी पकडून दुसऱ्या व सहाव्या तासिकेनंतर विद्यार्थ्यांना पाणी पिण्याची आठवण देण्यासाठी घंटा वाजविण्याची सूचना देण्यात आली असून, पर्यवेक्षणीय यंत्रणेद्वारे अंमलबजावणीबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

शाळा भेटीदरम्यान तसेच मुख्याध्यापकांच्या सभेमध्ये याबाबत आढावा घेण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई ओशिवरा येथील ओशिवरा प्रसूती गृह टोपीवाला गोरेगांव येथून लोटस इमारतीत स्थलांतरीत करण्याबाबत**

**(२४) ६३५७० (१२-०५-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ओशिवरा येथील ओशिवरा प्रसूती गृहाच्या नुतनीकरणाखाली घाईघाईने टोपीवाला गोरेगाव येथे स्थलांतरीत करण्यात आल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थलांतरणामुळे एस.व्ही.पी. नगर येथे महानगरपालिकेची प्रसूती गृहाची चार मजली इमारत बांधलेली असतानासुध्दा ओशिवरा प्रसूती गृह गोरेगाव येथे स्थलांतरीत करुन सदर ठिकाणी कूपर रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी वसतीगृह चालू केलेले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे वर्सोवा, ओशिवरा विभागातील असंख्य गरोदर महिलांचा उपचार तपासणीसाठी गैरसोय होत असल्याने टोपीवाला गोरेगाव येथे सद्:स्थितीत असलेले प्रसुती गृह लोटस इमारतीत तात्काळ स्थलांतरीत करण्याची मागणी तेथील स्थानिकांकडून होत वारंवार होत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रसूती गृह तातडीने टोपीवाला गोरेगाव येथून लोटस इमारतीत स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात आलेली आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) ओशिवरा प्रसुतीगृहाची इमारत जीर्णावस्थेत असल्याने धोकादायक स्थितीत होती. त्यानुषंगाने सदर इमारत निष्कासित करण्याबाबतचे अभिप्राय बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य पायाभूत सुविधा कक्षाकडून प्राप्त झाल्याने ओशिवरा प्रसुतीगृह टोपीवाला प्रसुतीगृह, गोरेगांव (प.) येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे.

(२) एस.व्ही.पी. नगर येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेची प्रसुतीगृहाची इमारत ओशिवरा प्रसुतीगृह, गोरेगाव येथे स्थलांतरीत करण्याअगोदरच कुपर रुग्णालयातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाकरिता कुपर रुग्णालयास देण्यात आले होते. सदर इमारतीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालयातील १०२ विद्यार्थ्यांचे वसतीगृह आहे.

(३) हे खरे आहे.

ओशिवरा प्रसुतीगृह दिनांक २४.०८.२०२० पासून टोपीवाला प्रसुतीगृह, गोरेगांव (प.) येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. याबाबत के/पश्चिम विभागातील सर्व लोकप्रतिनिधींना अवगत करण्यात आले आहे.

तसेच, के/पश्चिम विभागातील वर्सोवा, ओशिवरा येथील रहिवाशांना व गरोदर महिलांना उपचार / तपासणी करण्यासाठी ओशिवरा प्रसुतीगृह, गोरेगांव येथे संदर्भित केले जाते, त्यांची ओशिवरा प्रसुतीगृहात नोंदणी केली जाते व ओशिवरा प्रसुतीगृहामार्फत त्यांना सर्व सेवा पुरविल्या जातात.

(४) ओशिवरा प्रसुतीगृह कॅप्टन सामंत मार्ग, जोगेश्वरी (प.) येथे स्थलांतरीत करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असून, त्यानुषंगाने सदर इमारतीमध्ये संरचनात्मक बदल व इतर साहित्य खरेदी करण्याकरिता महानगरपालिकेच्या वास्तुशास्त्रज्ञ विभागाकडून निविदा मागविण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर काम पूर्ण झाल्यावर ओशिवरा प्रसुतीगृह कॅप्टन सामंत मार्ग, जोगेश्वरी (प.) येथे स्थलांतरीत करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अक्कलकोट (जि.सोलापूर) येथील शासकीय निवासी शाळा बंद होण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(२५) ६४१०७ (२५-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) येथील शासकीय निवासी शाळेत विविध समस्या असल्याने ती बंद होणार असल्याचे माहे जानेवारी २०२३ शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवासी शाळेतील विविध समस्येबाबत मा.साहय्यक, आयुक्त समाज कल्याण कार्यलयाला वेळोवेळी कळवूनही या शाळेतील मुख्याध्यापक, अधिक्षक, शिक्षक, सुरक्षारक्षक, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शालेय इमारत हस्तांतरत, सांडपाण्याचे व्यवस्थापन, मैदान समपातळी, क्रीडा मैदान, विद्युत व्यवस्थापन, बोरवेल बंद असणे,स्टेशनरी साहित्य पुरवठा न करणे आदी बाबींची पुर्तता करण्याची मागणी करूनही त्याची पुर्तता झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार अक्कलकोट येथील शासकीय निवासी शाळेच्या सर्व समस्या ताताडीने सोडवण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा कार्यवाही करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबांची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-१०-२०२३) :** (१) नाही.
(२) शासकीय निवासी शाळा अक्कलकोट (जि.सोलापूर) या शाळेतील प्रलंबित बाबी व अपूर्ण बांधकाम तातडीने पूर्ण करून इमारत विभागाच्या ताब्यात देण्याबाबत मुख्य कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या स्तरावर चौकशी समिती गठीत करून निवासी शाळेतील समस्या तातडीने निकाली काढून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महापालिका परिवहन प्रशासनाने बसेसवर चित्रपटाच्या जाहिराती मोफत प्रदर्शित केल्याबाबत**

**(२६) ६४६१९ (२४-०८-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महापालिका परिवहन प्रशासनाने महापालिकेच्या सुमारे २० बसेसवर मागील वर्षाच्या माहे मे, २०२२ रोजी प्रदर्शित झालेल्या "धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे" या मराठी चित्रपटाच्या जाहिराती मोफत झळकावून चित्रपटाची जाहीरात करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या आठ वर्षांपासून परिवहन प्रशासनाने उत्पन्न वाढीसाठी तीन वेळा बसेसवरील जाहिरातीसाठी निविदा काढूनही निविदा प्रक्रियेला ठेकेदारांकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने ठाणे महापालिकेच्या बसेस विना जाहिरात ठाणे शहरात फिरत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त परिस्थिती पाहता, सदर चित्रपटाचे जाहिरातीसाठी निविदा प्रक्रिया न राबविता ठेकेदार नसतांनाही वर्षभर या चित्रपटाच्या जाहिरातीचे पोस्टर टीएमटी बसेसवर चिकटवून त्याचे लाखो रुपयांचे भाडे महापालिका परिवहन प्रशासनास देण्यात आले नसल्याचे दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी ठाणे परिवहन प्रशासनाची आर्थिक स्थिती अत्यंत संकटात असतांना, निविदा न काढता व ठेकेदार न नेमता चित्रपटाच्या जाहिराती बसेसवर कोणाचे आदेशानुसार प्रदर्शित करण्यात आली आहे त्यांचे विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) तसेच, सदर चित्रपटाच्या वर्षभरापासून ते अद्यापपर्यंत सदर जाहिरातीच्या भाड्यापोटी किती रक्कम मिळणे अपेक्षित आहे व त्याबाबत चित्रपटाचे निर्माते व संबंधित व्यवसायिक यांचेकडून वसुलीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) त्याचप्रमाणे, मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई शहरातील बसेसवर "आपला दवाखाना" या प्रदर्शित करण्यात आलेल्या जाहिरातीबाबत उत्पन्नाचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१), (२), ३), ४) व ५) अशा आशयाच्या जाहिराती प्रदर्शित झाल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या बस ताफ्यातील बसेसवर माहे नोव्हेंबर, २०२१ पर्यंत जाहिरात प्रदर्शित करण्याचे काम कंत्राटदारास देण्यात आले होते.

ठाणे परिवहन सेवेकडे JNNURM अंतर्गत प्राप्त झालेल्या बसेसचे परिचालन, देखभाल व दुरुस्ती करण्याचे काम मे. सिटी लाईफ लाईन ट्रॅव्हल्स प्रा. लि. यांना देण्यात आले असून, त्यांचेकडील बसेसवर उक्त जाहिराती लावल्याचे निदर्शनास आल्यानंतर महानगरपालिकेमार्फत जाहिराती काढुन टाकण्याचे लेखी नोटीसीने कळविण्यात आले. तद्नंतर सदरच्या जाहिराती काढुन टाकण्यात आलेल्या आहेत. तसेच महानगरपालिका स्तरावर जाहिरात शुल्क वसुलीची कार्यवाही अंतिम करणे सुरु असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.
(६) सदर जाहिराती स्वखर्चाने प्रसिध्द केल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## धुळे महानगरपालिका क्षेत्रात ४० ग्रामपंचायत आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत

**(२७) ६४८१० (२७-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे महानगरपालिका क्षेत्रात समावेशित हद्दवाढ झालेल्या दहा गावांतील ४० ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरूपी सामावून घ्यावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणी लक्षात घेता उर्वरित ४० ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) नगरविकास विभाग व ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडील दि. ५ जानेवारी २०१८ च्या अधिसूचनेनुसार धुळे शहरातील हद्दवाढ करण्यात आली असून त्यात ११ गावांचा समावेश करणेत आलेला आहे. दि.१०.०८.२०१५ च्या प्रथम उद्- घोषणने नंतर नियुक्त झालेल्या ग्रामपंचायतील ४० कर्मचाऱ्यांच्या मूळ नियुक्त्या अनियमित व बेकायदेशीर असल्याचे निदर्शनास आल्याने तत्का.आयुक्त यांनी संबंधीत कर्मचाऱ्यांना दि.०७.०९.२०१८ पासून तोंडी आदेशाने सेवेतून कमी करण्याबाबत मान्यता दिलेली आहे.त्यानुसार संबंधीत कर्मचाऱ्यांना सेवेतून तोंडी आदेशाने कमी करण्यात आलेले असून सद्यस्थितीत सदर कर्मचारी सेवेत नाहीत.

---

### पनवेल (जि.रायगड) महानगरपालिका आकारत असलेल्या मालमत्ता करामध्ये सूट देण्याबाबत

**(२८) ६५१५७ (२८-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) महानगरपालिकेद्वारे आकारण्यात येणाऱ्या ५ वर्षाच्या मालमत्ता करामध्ये किमान २ वर्षाचा मालमत्ता कर रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिकेच्या हद्दीतील सिडकोने विकसित केलेल्या वसाहतींमध्ये एकाच वेळी सन २०१६ पासूनचा सेवा शुल्क व मालमत्ता कराचा दुहेरी भूर्दंड भरावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या ग्रामपंचायती व सिडको वसाहतींना आकारण्यात आलेल्या ५ वर्षाचा मालमत्ता कर आकारणीला शहरी व ग्रामीण भागातून नागरिकांनी प्रचंड विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल महानगरपालिका आकारत असलेल्या मालमत्ता करामध्ये २ वर्षाची सूट देण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) दिनांक ०१.११.२०२२ पासून सिडको प्रशासनाने त्यांची सेवा शुल्क आकारणी बंद केल्याचे पनवेल महानगरपालिकेने कळविले आहे.

सद्यस्थितीमध्ये सदर विषयाच्या अनुषंगाने विविध यचिका दाखल असून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. उक्त बाब विचारात घेऊन पुढील नियमोचित कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### साखर सुतारवाडी व केवनाले (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथील दरडग्रस्तांना तातडीने घरे देण्याबाबत

**(२९) ६५१६० (२८-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखर सुतारवाडी व केवनाले (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथे सन २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीतील दरडग्रस्तांना अद्यापही घरे मिळाली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक घरे उध्वस्त झाली असून ११ लोकांचा नैसर्गिक आपत्तीमुळे बळी गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावातील घरांसाठी साडे नऊ लाख रूपये निधी मंजूर झाला असून जवळपास २१ महिन्याचा कालावधी होवूनसुध्दा दरडग्रस्तांना देण्यात येणाऱ्या घरांच्या कामाला अद्यापही सुरूवात झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दरडग्रस्तांना तातडीने घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (२०-०९-२०२३) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही, जिल्हाधिकारी, रायगड यांनी विनंती केल्यानुसार मौजे केवनाळे व साखर(सुतारवाडी) ता. पोलादपूर, जि. रायगड येथे अतिवृष्टीमधील बाधीत दरडग्रस्त गावांच्या कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने भूसंपादनासाठी रु. १,५९,४६,७०७/- तर नागरी सोयी सुविधांसाठी रु.९,४६,१०,३०८/- इतका निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. तसेच घर बांधकामासाठी  निधी मंजूर करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## खामगांव (जि.बुलढाणा) नगरपालिकेअंतर्गत नागरी घन कचरा व्यवस्थापन व हाताळणीची कामे करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३०) ६५३५१ (२२-०८-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) नगरपालिकेअंतर्गत खामगांव शहरातील नागरी घन कचरा व्यवस्थापन व हाताळणीची कामे नगर परिषद खामगांव व्दारा खामगांव क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाची कामे घंटागाडीव्दारे संकलन व वाहतुक तसेच विकेंद्रीकरण इत्यादी कामे शास्त्रशुध्द पध्दतीने प्रक्रीया करणे या कामांसाठी १५ व्या वित्त आयोगातून निधी वितरीत करण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खामगांव नगरपालिकेला सदर काम करण्याकरीता रु.४,२५,१८,२५६/- इतका खर्च अपेक्षीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नगरपालिकेकडे सन २०२३-२४ चे नागरी घनकचरा व्यवस्थापनाची कामे करण्यासाठी रु.२,४८,०२,३१६/- इतक्या निधीची मागणी मुख्याधिकारी, खामगांव यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरची कामे पुर्ण करण्यासाठी १५ व्या वित्त आयोगातून उर्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशी / मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील दशलक्षी व विनादशलक्षी शहरांना केंद्र शासनाने निश्चित केल्यानुसार निधी वितरीत करण्यात येतो. त्यानुसार खामगाव नगपरिषद यांना विनादशलक्षी शहरांतर्गत बंधनकारक व अबंधनकारक अनुदान वितरीत करण्यात येत असून त्याअंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाकरिता निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

केंद्र शासनाकडून उपलब्ध होणारे अनुदान हे संबंधित शहराची लोकसंख्या व क्षेत्रफळ यानुसार वितरीत करण्यात येते.

१५ व्या वित्त आयोगांतर्गत खामगाव नगरपरिषद यांना घनकचरा व्यवस्थापन करिता रु.२.४८ कोटी निधी मंजूर करण्याची विनंती मा.लोकप्रतिनिधी यांनी दि.१५.०७.२०२३ अन्वये शासनास केली आहे, हे खरे आहे.

१५ व्या वित्त आयोगांतर्गत सन २०२०-२१ ते २०२२-२३ या कालावधीत खामगाव नगरपरिषद यांना बंधनकारक व अबंधनकारक असे एकूण रू.१,१६,१८,७९९/- एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

चालू आर्थिक वर्ष सन २०२३-२४ करिता अनुज्ञेय निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध झाल्यानंतर तात्काळ खामगाव नगरपरिषद यांना वितरीत करण्यात येईल.

---

**सिंचन प्रकल्पाचा लाभ क्षेत्रातील शेती जमिनीच्या हस्तांतरणबाबतच्या पत्राबाबत**

**(३१) ६५३५२ (२२-०८-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंचन प्रकल्पाचा लाभ क्षेत्रातील शेती जमिनीच्या हस्तांतरणबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे दिनांक १ जून, २०२२ चे पत्र रद्द करण्याची मागणी स्थानिक शेतकरी आणि लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंचन प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात काढलेला शासन निर्णय क्रमांक आरपीए -२०२२/प्र.क्र.०९ /र.१ दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ अन्वये जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कांमध्ये हस्तांतरण निर्बंध विषयी नोंदी वगळून त्याऐवजी पुनर्वसन अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने राज्य शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून 'फक्त शेती वापरासाठी हस्तांतरण व्यवहार अनुज्ञेय' अशी नोंद शासन निर्णयाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत घेण्याचे आदेशित करून हस्तांतरणावरील निर्बंध शिथिल करण्यात आले तशी नोंद असतानाही जिल्हाधिकारी यांनी दिनांक १ जून, २०२२ रोजी काढलेल्या परिपत्रकामुळे मा.उच्च न्यायालय आणि शासन निर्णयाचा अवमान झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी दिनांक १ जून २०२२ रोजी काढलेले पत्र रद्द करून शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१८-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शासन पत्र क्र आरपीए-२०२३/ प्र.क्र. ६१/र-१, दि ०९.०८.२०२३अन्वये शासन निर्णय दि ११.०२.२०२२ नुसार निर्बंध उठविण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अटाळी पाझर तलाव (ता.खामगांव जि.बुलढाणा) या योजनेचे काम जमिनीच्या मोबदल्याअभावी अपूर्ण असल्याबाबत**

**(३२) ६५४७१ (३१-०८-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अटाळी पाझर तलाव (ता.खामगांव जि.बुलढाणा) या योजनेचे काम जमिनीच्या मोबदल्याअभावी अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनीच्या मोबदल्याबाबत सरळ खरेदी प्रस्ताव जलसंधारण विभाग,बुलढाणा यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार सरळ खरेदी प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्यात येवून अटाळी पाझर तलावाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१३-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अटाळी पाझर तलाव योजनेकरीता मौजे अटाळी शिवारातील ११.०४ हे. आर व पेडका शिवारातील १.१८ हे आर अशी एकूण १२.२२ हे आर जमीन संपादित होत आहे. जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या दि.१६.११.२०२१ च्या आदेशान्वये मौजे अटाळी शिवारातील एकूण ११.०४ हे आर जमीनीचा सरळ खरेदी प्रस्ताव मंजूर झालेला आहे. पेडका शिवारातील १.१८ हे आर जमीनीचा सरळ खरेदी प्रस्ताव या विभागामार्फत उपविभागीय अधिकारी (राजस्व) खामगांव

जि. बुलढाणा यांना पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**पाटगाव (ता.भुदरगड,जि.कोल्हापूर) परिसरात वासनोली लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम निकृष्ट झाल्याने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत करण्याबाबत**

**(३३) ६५५५६ (३१-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटगाव (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) परिसरात वासनोली लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या कामावर कोटयवधी रुपये खर्च करुनही सन २०२१ मध्ये कालव्याचा सांडवा निकृष्ट दर्जाचे कामामुळे तुटून त्यातील पाण्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याचे दिनांक २ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१३-१०-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण विभाग, पुणे यांचेमार्फत चौकशी सुरु असून सदर कालावधीमध्ये कोल्हापूर जिल्हयामध्ये अतिवृष्टीसदृष्य पाऊस झाल्यामुळे ब-याच ठिकाणी पिकांचे नुकसान झाल्यामुळे महसूल विभागामार्फत पंचनामा करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**पुणे येथील आरटीओला माहिती न देता अनेक सरकारी वाहने स्क्रॅप करण्यात आल्याबाबत**

**(३४) ६५९२९ (३०-०८-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे आरटीओच्या नोंदीनुसार २ हजार ६६५ स्क्रॅप वाहने आहेत मात्र वाहनांच्या नोंदीसाठी आरटीओने तयार केलेल्या वेब पोर्टलवर केवळ ८५६ वाहनांची नोंद झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही सरकारी कर्मचाऱ्यांनी परस्पर १४९६ वाहने आरटीओला माहिती न देता स्क्रॅप केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे येथील आरटीओला माहिती न देता अनेक सरकारी वाहने स्क्रॅप करण्याऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-१०-२०२३) :** (१) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे या कार्याक्षेत्रातील कार्यालयांकडून प्राप्त माहितीनुसार निष्कासन व नोंदणी रद्द करण्यासाठी एकूण ८५५ वाहनांनी MSTC पोर्टलवर लिलाव प्रक्रियेकरीता नोंद घेण्यात आली आहे.
(२) व (३) वाहन ४.० या प्रणालीवर शासकीय कार्यालयांच्या नावे नोंद असलेल्या आणि १५ वर्षे आयुर्मान पूर्ण झालेल्या २०१० वाहनांची व मोटार वाहन निरीक्षक यांच्या भेटीदरम्यान जडवस्तुसंग्रह अभिलेखानुसार आढळून आलेल्या ६५५ अश्या एकूण २६६५ वाहनांची नोंदणी दि.०१.०४.२०२३ रोजी रद्द केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगाव ( जि.नाशिक ) तालुक्यातील काटया मारुती ते कॅम्प बंधारा पुलावर फेरीवाल्यांमुळे वाहतूकीची कोंडी होत असल्याबाबत

**(३५) ६५९९७ (२८-०८-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात असलेल्या काटया मारुती ते कॅम्प बंधारा असे दहा पुलावर मोठया प्रमाणात विक्रेते, फेरीवाले यांनी व्यापल्यामुळे वाहतूकीची कोंडी होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलावरुन नागरिक जीव मुठीत घेऊन ये-जा करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर पुलावरील विक्रेते, फेरीवाले यांना तात्काळ हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे

(२) हे खरे नाही

(३) व (४) मालेगांव महानगरपालिकेचे अंतर्गत बीट मुकादम कर्मचाऱ्यांचे गस्ती पथक व अतिक्रमण पथक कार्यरत असून, सदर पथकाकडून विक्रेते,फेरीवाले आढळून आल्यास अतिक्रमण पथका मार्फत त्यांना हटविण्याची नियमीत कारवाई करण्यात येत असून प्रसंगी विक्रेते,फेरीवाले यांचे अतिक्रमण होऊ नये यासाठी दररोज सदर पुलांवर अतिक्रमण विभागामार्फत पहाणी/गस्त घालण्यात येत असून यासाठी पथकाची नियुक्ती करणेत आलेली आहे.

तसेच दोन्ही पुलांवरील खाजगी वाहने हटविणेसाठी स्थानिक पोलीस खात्याची देखील मदत वेळोवेळी घेण्यात येत असते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक) शहरातील स्मशानभूमीच्या अस्वच्छतेकडे महापालिकेचे होत असलेले दुर्लक्ष

**(३६) ६६००० (२८-०८-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहराच्या वाढत्या नागरिकरणामुळे वेशीबाहेरील स्मशानभूमी या वस्त्यामध्ये किंवा घराशेजारी आल्यामुळे आजबाजुच्या नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण व शहरी भागात स्मशानभूमी या नदीकिनारी किंवा गावाच्या बाहेर होत्या, परंतु मात्र वाढती लोकसंख्या, वाढलेले शहरीकरण यांमुळे स्मशानभूमी व वस्त्यामधील अंतर कमी होत चालले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्मशानभूमीच्या अस्वच्छतेकडे महापालिकेचे दुर्लक्ष होत असल्याने त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

(३) मालेगाव मनपाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या स्मशानभूमीसाठी प्रत्येकी २ कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे त्यांच्या मार्फत स्मशानभूमीची नियमित साफ सफाई करण्यात येऊन आजुबाजुच्या परिसरात फवारणी व धुराळणी करण्यात येत असते.तसेच स्मशान भूमीच्या आजूबाजूच्या नागरीकांच्या आरोग्यावर दुष्परीणाम होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) प्रश्न प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक शहरातील खाजगी शाळा दरवर्षी मनमानी पध्दतीने अवास्तव शुल्क वाढ करीत असल्याबाबत**

**(३७) ६६१८७ (२५-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील खाजगी शाळा दरवर्षी मनमानी पध्दतीने अवास्तव शुल्कवाढ करीत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या वर्षात शहरातील ८० पेक्षा अधिक शाळांच्या तक्रारी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन येथील खासगी शाळांच्या शुल्क वाढीवर नियंत्रण आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ मध्ये तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(३) नाशिक मनपाच्या परिपत्रकान्वये महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनियमन अधिनियम २०११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क पालक-शिक्षण संघ कार्यकारणी समिती यांचे मार्फत मंजुरी घेवून शुल्क निश्चित करणेबाबत वेळोवेळी कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या निधीचा**
**गैरव्यवहार करणाऱ्या ठेकेदारांनाच कामे दिल्याबाबत**

**(३८) ६६४५९ (२४-०८-२०२३). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या निधीचा गैरव्यवहार करुन शासनाची फसवणूक करणाऱ्या ठेकेदारांनाच कामे देत असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, या ठेकेदारांवर विरार पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा देखील दाखल असून महानगरपालिकेने संबंधित ठेकेदारांना ठेका संपल्यावर मुदतवाढ दिलेली आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय.
(४) असल्यास, चौकशीअंती शासनाची फसवणूक करणाऱ्या ठेकेदारांवर व ठेका देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१), (२), (३) व (४) सदरची बाब निदर्शनास आली असल्याची वस्तुस्थिती आहे.

सदर प्रकरणी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संबंधित ठेकेदाराविरुध्द विरार पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तथापि, सदर ठेकेदारापैकी आस्थापना विभागात मनुष्यबळ पुरवठादार म्हणुन सन २०१८ पासून सबंधित गुन्हा दाखल असणाऱ्या ठेकेदारांची आजतागायत नेमणूक केली नसल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

परंतु उपरोक्त ठेकेदारांपैकी काही ठेकेदार महानगरपालिकेच्या दैनंदिन कचरा संकलन वाहतुकीकरणाचे काम करीत असल्याची वस्तुस्थिती आहे. या कामाच्या ठेका सन २०१८ पासून आजतागायत सुरू आहे. उक्त कामांच्या त्रैवार्षिक ठेक्यास महानगरपालिकेच्या स्तरावर वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी विविध विधानमंडळ आयुधाद्वारे या विषयी मुद्दे उपस्थित झाले असून शासन स्तरावरुन याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील हजारो झाडे महानगरपालिकेची परवानगी न घेता तोडल्याबाबत

**(३९) ६७६५६ (२७-०८-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील हजारो झाडांची तोड महानगरपालिकेची परवानगी न घेता करण्यात आल्याची बाब दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेची परवानगी न घेता वृक्षतोड करणाऱ्यांविरोधात नियमानुसार कारवाई करण्याचे व दंड न भरल्यास घरपट्टीवर बोजा लावण्याचे शासनाने दिनांक १३ मार्च, २०२२ रोजी आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांकडून दंडाची पूर्ण रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) हे अशंत: खरे आहे. सन २०२३ मध्ये विविध ठिकाणी २०६ वृक्षांची विनापरवानगी छाटणी/ तोड झाल्याची नोंद आहे.

(२) होय हे खरे आहे विनापरवानगी ३६ वृक्षांचा विस्तार/ऊंची अनाधिकृत रित्या तोडण्यात आल्याबाबत संबंधितांनी दंड न भल्यास घरपट्टीवर बोजा लावण्याचे आश्वासन शासनाने दि. १४ मार्च २०२२ रोजी दिले होते.

(३) विनापरवानगी छाटणी व तोड करणाऱ्यांना दंडाची पुर्ण रक्कम वसुल करण्याबाबत मनपामार्फत संबंधितांना वेळोवेळी नोटिस बजावण्यात येते.दंडाची पुर्ण रक्कम न भरल्यास संबंधितांवर महाराष्ट्र(नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे प्रकरण ८ कलम २१(१) अन्वये कायदेशिर कारवाई करण्यात येते.

लक्षवेधी सुचना क्र. ४३७५/फ प्रकरणी संबंधितांनी दंडाची पुर्ण रक्कम भरणेस असहमती दर्शविली आहे, त्यास अनुसरुन त्यांनी वकिलांकरवी मनपास नोटीस पाठविली आहे.मनपाने पॅनलवरील वकिलांची नियुक्ती केली असुन भा.द.सं. कलम १५५ अन्वये दंडाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त होणेकरीता कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे मनपामार्फत संबंधितांच्या घरपट्टीवर बोजा लावण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाने ओला, उबेर व इतर ॲग्रीगेटर्स कंपन्यासाठी मार्गदर्शक सूचना/ नियमावली करण्यासाठी स्थापन झालेल्या समितीबाबत

**(४०) ६७७५८ (३०-०८-२०२३). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने ओला, उबेर व इतर ॲग्रीगेटर्स कंपन्यासाठी मार्गदर्शक सूचना/ नियमावली करण्यासाठी सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव सुधीर श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खेर आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचे अन्य सदस्य कोण आहेत व समितीची कार्यकक्षा काय आहे,

(३) असल्यास, सदर समितीकडे नागरिकांकडून किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत व तक्रारीचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, समितीचा अहवाल किती कालावधीत प्राप्त होणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१) होय.

(२) दि.०५.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात ॲप बेस वाहनांसाठी Maharashtra Regulation of the Aggregator Rules, २०२२ तयार करण्यासाठी पुढील प्रमाणे समिती गठित करण्यात आली आहे.

| अ. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुधीरकुमार श्रीवास्तव<br>(सेवानिवृत्त भा.प्र.से.) | अध्यक्ष |
| २ | अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ३ | उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ | सदस्य |
| ४ | परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ५ | अपर परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई | सदस्य |
| ६ | सहाय्यक परिवहन आयुक्त (अंमल-१) परिवहन आयुक्तकार्यालय, मुंबई | सदस्य-सचिव |

समितीची कार्यकक्षा : सदर समितीने मा. उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचा अभ्यास करुन केंद्र शासनाच्या Motor Vehicle Aggregator Guidelines २०२० नुसार राज्यातील समुच्चयकांबाबत (App & Web based Aggregator) शिफारशींसह अहवाल शासनास सादर करणे.

(३) दि.२०.०५.२०२३ पर्यंत २०५ मत/अभिप्राय प्राप्त आहेत. त्यामध्ये ग्राहक/प्रवाशांनी वाहन चालक यांच्यासंदर्भात, वाहन चालक यांनी कंपन्याबाबत व ॲप बेस वाहनांव्यतिरिक्त इतर प्रवासी सेवा देणाऱ्या वाहनांच्या चालकांनी आपले अभिप्राय/मत नमूद केले आहे.

(४) समितीच्या एकूण पाच बैठका झाल्या आहेत. समितीच्या अहवालाबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

## पुणे महामेट्रोच्या कामात अनेक त्रुटी असल्याबाबत

**(४१) ६८०८६ (३१-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महामेट्रोने निविदा प्रक्रिया न राबविताच नागपूर मेट्रो प्रोजेक्टसाठी काम करणाऱ्या जनरल कन्सल्टन्सीला पुणे मेट्रो रेल्वे प्रोजेक्टचे काम दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कॅगने (नियंत्रक व महालेखापरिक्षक) पुणे मेट्रो कामात अनेक त्रुटी व कामांमधील पारदर्शकतेच्या अभावामुळे मेट्रोच्या कार्यपध्दतीवर तीव्र ताशेरे ओढले असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन पुणे महामेट्रोच्या कार्यपध्दतीची चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१) महा मेट्रोमार्फत निविदा प्रक्रिया राबवून नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी सामान्य सल्लागार म्हणून नेमण्यात आलेल्या मे.सिस्ट्रा, मे. राईट्स, मे.एईकॉम व मे. एजिस यांच्या कन्सोर्शियमला वेरिएशन वर्क म्हणून पुणे मेट्रोकरीता देखील सामान्य सल्लागार म्हणून काम केले होते. सदर सामान्य सलागाराची मुदत संपल्यानंतर पुणे मेट्रो करीता निविदा प्रक्रिया राबवून उर्वरित कामासाठी मे.सिस्ट्रा, मे. सीईजी व मे.एईकॉम यांच्या कन्सोर्शियमला सामान्य सल्लागार म्हणून नेमण्यात आले.
(२), (३) व (४) महामेट्रो मार्फत राबविण्यात येणाऱ्या पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-१ प्रकल्पाची नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्यातर्फे अद्याप लेखापरिक्षण झालेले नाही. तथापि एप्रिल, २०२३ मध्ये महामेट्रोच्या वनाज ते नळ स्टॉप यामधील एकूण ५ मेट्रो स्थानकांच्या बांधकामात त्रुटी असल्याबाबत महामेट्रोकडे तक्रार प्राप्त झाली होती. प्राप्त तक्रारीनुसार सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (तत्कालीन कॉलेज ऑफ इंजिनियरींग, पुणे) यांच्यामार्फत स्ट्रक्चरल ऑडीट करून घेण्यात आलेले आहे. यासंदर्भात प्राथमिक अहवाल दि. १०.०३.२०२३ रोजी महामेट्रोला सादर केला. तदनंतर विद्यापीठाने दिनांक २५.०५.२०२३ रोजी वनाज ते नळस्टॉप दरम्यानच्या ५ मेट्रो स्थानकांचे स्ट्रक्चरल सुरक्षेबाबत विस्तृत अंतिम अहवाल महामेट्रोला सादर केला आहे. सदर अहवालानुसार पाचही मेट्रो स्थानकांची मूळ संरचना सुरक्षित असून कारागिरीशी (workmanship) व संरचनात्मक जोड (Structural Connection) यांच्याशी निगडीत दुरुस्त्या सुचविल्या आहेत. त्याप्रमाणे महामेट्रोमार्फत सर्व त्रुटीची पुर्तता करण्यात आलेली आहे.

---

### अहमदनगर महानगरपालिकेतील परिशिष्ट अ वर नोंदी करताना कर्मचाऱ्यांकडून करण्यात येणारा विलंब व गैरव्यवहाराबाबत

**(४२) ६८११६ (३१-०८-२०२३). श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी गावठाण मधील परिशिष्ट ‘अ’ मध्ये कर आकारणी केलेल्या मिळकतीचे नकाशे, मालकी हक्काचे सातबारा, प्रॉपर्टी कार्ड हे दस्त उपलब्ध नसताना महापालिकेने परिशिष्ट ‘अ’ वर संकलित कर आकारण्याच्या नोंदी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिशिष्ट ‘अ’ वरील संकलित कराची नोंद ही सातबारा, प्रॉपर्टी कार्ड सारखा मालकी हक्काचा अधिकृत अभिलेख आहे याबाबत कायद्यात तरतूद नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिशिष्ट ‘अ’ वर संकलित कराची नोंद करताना नागरिकांच्या तक्रारी घेणे सुनावणी करणे मालकी हक्क ठरवणे याबाबत मनपा कर्मचाऱ्यांना अधिकार नाही, हे ही खरे आहे काय, असल्यास, सावेडी गावठाण मध्ये परिशिष्ट अ वर इतर मिळकत धारकांकडून सातबारा, प्रॉपर्टी कार्ड, सातबारा वरून झालेली खरेदी खते न घेता ज्याप्रमाणे नोंदी केल्या आहेत त्याप्रमाणे अर्जदार श्री.अंकुश बारस्कर यांनी दिलेल्या अर्ज प्रतिज्ञा पत्रानुसार त्यांच्या मिळकतीची संकलित कर आकारणी परिशिष्ट अ वर महापालिका नोंद करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मिळकत कराच्या नोंदी करतांना तेथील कर्मचारी भेदभाव, विलंब तसेच गैरव्यवहार करीत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच श्री.अंकुश बारस्कर यांच्या नोंदी बाबत श्रीओम प्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांनी अहमदनगर महानगरपालिकेस दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या पत्रावर कार्यवाही केली नसल्याने, विलंब करणाऱ्या कर्मचाऱ्यावर विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ अन्वये शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

संकलित कराच्या नोंदी करणे बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ कराधान नियम अन्वये तरतुदी आहेत.संकलित कराची नोंद करतांना आयुक्तांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ कराधान नियम १६,१७,१८ अन्वये संकलित कराच्या संदर्भात प्राप्त तक्रारी वर सुनावणी घेउन त्यावर निर्णय घेणे किवा ती निकाली काढण्याचा अधिकार आहे.परंतु मालकी हक्क ठरविणे ही बाब उक्त अधिनियमांमध्ये अंतर्भुत नाही.

अर्जदार श्री.अंकुश बारस्कर यांनी दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या पत्रानुसार कळविण्यात आलेली आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याने त्यांच्या मालमत्तेचे हस्तांतरण करण्यात आलेले नाही व प्रकरण दप्तरी ठेवण्यात आलेले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) संबंधित कर्मचाऱ्यां विरुद्ध मनपा तर्फे विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाना विकास आराखड्याच्या पारदर्शकतेचे उद्दिष्ठ ठेऊन (ELU) जनहितार्थ प्रसिद्ध (Publish) करण्याबाबत

**(४३) ६८३९९ (३१-०८-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाना विकास आराखड्याच्या पारदर्शकतेचे उद्दिष्ठ ठेऊन (ELU) जनहितार्थ प्रसिद्ध (Publish) करण्याबाबत भिवंडी (पूर्व) लोकप्रतिनिधी यांनी दि २४ जानेवारी, २०२३ रोजी अप्पर मुख्य सचिव नगरविकास विभाग यांना निवेदन देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून (M.R.T.P) अँक्ट अंतर्गत विकास आराखडा बनविण्याचे काम सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहराचा विकास आराखडा बनवत असताना पहिले पाऊल म्हणजे जागेच्या वापराबाबत धोरण आखणे हा मुख्य मुद्दा असतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाना विकास आराखड्याच्या पारदर्शकतेचे उद्दिष्ठ ठेऊन (ELU) जनहितार्थ प्रसिद्ध (Publish) करण्याबाबत शासनामार्फत कोणते धोरण आखण्यात आले आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत नियोजन प्राधिकरणांमार्फत (विद्यमान व प्रस्तावित जमिन वापर) विकास योजना तयार करण्यात येते.
(३) होय, हे खरे आहे.
(४) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम २५ नुसार नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीचे सर्वेक्षण करुन विद्यमान जमीन वापर नकाशा (ELU) तयार करण्याची तरतूद आहे. सदर कलमाअंतर्गत विद्यमान जमीन वापर नकाशे (ELU) तयार झालेनंतर प्रसिध्द करणेबाबत तरतुद नाही. सदर अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रारुप विकास योजना नागरीकांच्या सूचना / हरकतींसाठी प्रसिध्द करताना, त्यासह विद्यमान जमीन वापर (ELU) अहवाल, नकाशा, प्रारुप नकाशा तयार करणेकामी, करण्यात आलेले सर्वेक्षण इ. तपशिल अन्य बाबींसह नागरीकांच्या अवलोकनासाठी / तपासणीसाठी प्रसिध्द करण्याची कलम २६ (२) नुसार तरतुद आहे.
यानुसार कलम २६(१) अन्वये प्रारुप प्रसिध्द विकास योजनेवर सूचना / हरकती देताना, त्यावेळी प्रसिध्द करण्यात येणा-या विद्यमान जमीन वापर नकाशा (ELU) नकाशावर देखील सूचना / हरकती देण्याची संधी नागरीकांना उपलब्ध राहते.

तथापि सद्यस्थितीत विद्यमान जमीन वापर नकाशा (ELU) तयार झालेनंतर कलम २५ अन्वये वेगळ्याने जनहितार्थ प्रसिध्द करण्याबाबत तरतुद नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंचवटी (जि.नाशिक) येथील गणेशवाडी परिसरातील नागरिकांना अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(४४) ६९०२४ (३१-०८-२०२३). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचवटी (जि.नाशिक) येथील गणेशवाडी व इतर भागात नाशिक महानगरपालिकेमार्फत होणाऱ्या दुषित व अशुद्ध पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यास्तव नागरिकांनी शुद्ध पाणी पुरवठा होण्याकरिता महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन करण्याबाबतचे लेखी निवेदन उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पंचवटी यांच्याकडे दिनांक १३ मे, २०२३ व १ जून, २०२३ रोजी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१) पंचवटी पाणी पुरवठा विभागास गणेशवाडी व इतर भागास पाणी पुरवठा दुषित होत असल्याचे दुरध्वनीव्दारे माहिती मिळताच सदर तक्रारीबाबत मनपामार्फत तत्काळ दखल घेऊन सदर तक्रारीचे निराकरण करणेत आलेले आहे.त्यामुळे नागरीकांच्या आरोग्याला होणारा धोका टाळण्यात आलेला आहे.
(२) नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा होण्याकरीता महानगरपालिकेच्या विभागीय अधिकारी यांचेमार्फत पाणी पुरवठा विभागास पत्र प्राप्त झाले आहे.परंतु कार्यालयावर मोर्चा काढुन आंदोलन करण्याबाबतचे लेखी निवेदन उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग,पंचवटी यांच्याकडे दिनांक १३ मे, २०२३ व १ जून, २०२३ रोजी प्राप्त झालेले नाही.
(३) नळाच्या पाईपलाईन या भुयारी गटारीच्या चेंबर्स मधुन गेलेल्या असल्याने खाजगी नळ कनेक्शन जीर्ण झालेले होते.त्यामुळे सदर चेंबर्स चोकअप झालेने पुर्णत: भरले गेले होते. त्यामुळे पाण्याच्या पाईपलाईन जीर्ण होऊन दुषित पाणी पुरवठा होत होता.सदर परिसरातील पुर्ण चेंबर्स तपासुन त्यांचे चोकअप काढून ड्रेनेज लाईन सुरळीत करण्यात आल्यात व आढळुन आलेले जीर्ण कनेक्शन तात्काळ बंद करण्यात आले त्यामुळे दुषित पाणी पुरवठा बंद झाल्याने शुद्ध पाणी पुरवठा सुरळीत करणेत आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिद्धापूर (ता.मंगळवेढा, सोलापूर) येथील भीमा नदी पात्रात मृत पावलेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(४५) ६९७७४ (०४-०९-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिद्धापूर (ता.मंगळवेढा, सोलापूर) येथील भीमा नदीपात्रात कपडे धुण्यासाठी गेलेल्या नेपाळमधील गोरखा कुटुंबातील तीन बालके व दोन महिलांपैकी चौघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक १३ एप्रिल, २०२३ रोजी घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मृतकांच्या कुटुंबियांना शासनाकडून आर्थिक मदत मिळावी याकरीता नागरिकांनी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मृतकांच्या कुटुंबियांना शासनाकडून मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१७-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे सिध्दापूर, ता. मंगळवेढा येथील जिल्हा परिषद शाळेजवळ असणाऱ्या भीमा नदीच्या पात्रात नेपाळमधील खालील चार जणांचा दि.१३/०४/२०२३ रोजी पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे.

१) बालूदमाई करणसिंग नेपाली वय ३५ वर्ष
२) सौ. मनसरादभाई महेंद्रसिंग नेपाळी, वय ३३ वर्ष
३) हिरदेश महेंद्रसिंग नेपाली, वय ८ वर्ष
४) नमुना करणसिंग नेपाळी, वय ११ वर्ष

(२) हे खरे नाही,

सदर घटनेबाबत मृतकाच्या कुटुंबियांना शासनाकडून आर्थिक मदत मिळावी याबाबत कोणत्याही नागरीकांनी किंवा सामाजिक संस्था अथवा संघटना यांचेकडून कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) उपलब्ध अहवालावरुन सदर मृत्यू नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नसल्याने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देय ठरत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे देवसरी ( ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील पूरबाधित ९९ कुटुंबाचा अंशतः पुनर्वसनाचा सुधारित प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत

**(४६) ६९९१८ (०४-०९-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवसरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील पूरबाधित ९९ कुटुंबाचा अंशतः पुनर्वसनाचा सुधारित प्रस्तावास निधी मंजूर करुन प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (२०-०९-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

(२) प्रस्तावातील त्रुटीची पुर्तता करुन पुनर्वसनास शासन मान्यतेसाठी प्रस्तावीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील शासकीय कार्यालयांनी महानगरपालिकेची कोट्यवधी रुपयांची घरपट्टी व पाणीपट्टी प्रलंबित ठेवल्याबाबत

**(४७) ७०२११ (३१-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील २२ शासकीय कार्यालयांनी महानगरपालिकेची सुमारे १० कोटींची घरपट्टी व पाणीपट्टी प्रलंबित ठेवली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्वउत्पन्नाची साधने निर्माण करण्याबरोबरच महानगरपालिका प्रशासनाकडून घर व पाणीपट्टी थकबाकीदारांवर कारवाई करण्यासाठी जवळपास ७५ हजार नोटिस पाठवून देखील शासकीय कार्यालयांकडून महानगरपालिकेची घरपट्टी व पाणीपट्टी न भरल्याने महानगरपालिका आर्थिक अडचणीत सापडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकीकडे महानगरपालिका ५० हजारांपेक्षा अधिक घरपट्टी थकीत असणाऱ्या करदात्यांच्या मालमत्ता जप्त करुन करुन लिलाव करण्याचे तर २५ हजारांपेक्षा अधिक पाणीपट्टी थकीत असणाऱ्या करदात्यांचे नळजोडणी तोडण्याचे आदेश देत असून देखील शासकीय कार्यालयांवर कोणतीच कारवाई होत नसल्याने प्रशासनाबाबत नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सत्वर सखोल चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबधित कार्यालयांकडून घरपट्टी व पाणीपट्टी वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१०-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) नाशिक महानगरपालिका हद्दीमधील महाराष्ट्र शासनाच्या मिळकतींवर सरकारी शिक्षण कर व रोजगार हमी कर वगळता मालमत्ता कर लागु आहे. त्यानुसार नियम ३९ नुसार प्रतिवार्षीक देयके बजावणी करण्यात येतात.शासकीय कार्यालयांनी विहित मुदतीत मालमत्ता करचा भरणा न केल्याने, माहे मार्च -२०२३ मध्ये प्रत्येक शासकीय कार्यालयांना अर्धसमास पत्र बजावीण्यात आले आहेत.त्यापैकी बहुतांशी शासकीय कार्यालयांनी शासनाकडुन निधी प्राप्त झाल्यानंतर मालमत्ता कर भरणा करणेत येईल असे कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महापालिका हद्दीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुलाला काही भाग कोसळल्याबाबत**

**(४८) ७०२१९ (३१-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुलाचा काही भाग कोसळल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुलाच्या मार्गावर ठिकठिकाणी पुलाचा भाग पडला असल्याने हा भाग धोकादायक झालेला असून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलावरुन मोठ्या प्रमाणात वाहतूकीची वर्दळ असल्याने पुलाची दुरुस्तीची मागणी स्थानिक नागरिकांनी केलेली असून देखील महानगरपालिकेचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) नाशिक महानगरपालिका हद्दीतील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुल (व्हिक्टोरीया पुल) साधारण सन १९०० मध्ये बांधलेला असून सद्यस्थितीत हा पुल साधारण १२५ वर्षे जुना आहे.सद्यस्थितीत सदर पुलाचा वापर सुरु आहे.सदर पुलाचे निर्धारित आर्युमान संपल्याने पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेचे काम विरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इंन्स्टीटयुट (VJTI) माटुंगा मुंबई या संस्थेस देणेत आले होते.स्ट्रक्चर ऑडीट रिपोर्टनुसार पुल सुस्थितीत असुन पुलाचे कोणतेही नुकसान झालेले नाही.
परंतु एप्रिल -२०२३ मध्ये एका स्थानिक वृत्तपत्राने वृत्त प्रसिद्ध केल्यानुसार शहर अभियंता यांनी सदर पुलाची पाहणी केली असता पुलास दोन्ही बाजुचे फुटपाथवर काही ठिकाणी Expansion joint च्या ठिकाणी अकुंचन/प्रसरण पावण्यासाठी टाकण्यात आलेले Bituminous pad चे तुकडे निघालेले दिसले. मात्र कुठेही स्लॅब तुटलेला आढळलेला नाही. Bituminous pad निघालेल्या ठिकाणी तात्काळ दुरुस्ती करणेत आली असून सदर पुल सुस्थितीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाघोली (पुणे) या गावाकरिता नागरिकांच्या सोईकरिता उपायुक्त दर्जाचा अधिकारी नेमणेबाबत**

**(४९) ७०७२४ (३१-०८-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघोली गावाचा पुणे महानगरपालिकेमध्ये समावेश होऊन दीड वर्ष झाले असून या गावाची लोकसंख्या सुमारे

साडेतीन लाख असून येथे उपायुक्त दर्जाचा अधिकारी नसल्याने नागरिकांना दैनंदिन भेडसावणाऱ्या समस्येकरिता वडगांव शेरी येथील क्षेत्रीय कार्यालयात जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे वेळ आणि इंधन या दोन्ही गोष्टींचा अपव्यय होत असून तो टाळण्यासाठी आणि वाघोली येथील प्रशासकीय कामाला गती मिळण्यासाठी उप आयुक्त दर्जाचा अधिकारी व सर्व विभागीय कर्मचारी यांचे कार्यालय वाघोली उपनगरात होणेबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२३) :** (१) वाघोलीसाठी स्वतंत्र क्षेत्रीय कार्यालय नसून ते नगररोड-वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिनस्त आहे. तथापि, नागरीकांच्या समस्यांचे वेळेवर निराकरण होणेसाठी वाघोली येथील संपर्क कार्यालयामध्ये पूर्णवेळ संपर्क अधिकारी व तांत्रिक अधिकारी यांची सध्यस्थितीमध्ये नेमणूक करण्यात आली असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयासाठी सहाय्यक आयुक्त पद मंजूर आहे. क्षेत्रीय कार्यालयासाठी उप आयुक्त दर्जाचे पद मंजूर नसून परिमंडळासाठी उप आयुक्त हे पद मंजूर आहे. सध्यस्थितीत सहाय्यक आयुक्तांची १२ पदे रिक्त असल्याने प्रभारी पदभार देऊन कामकाज सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी येथे उर्दू घराची उभारणी करण्याकरीता जागा मिळण्याबाबत

**(५०) ७०८६६ (३१-०८-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भिवंडी हा मोठ्या प्रमाणात मुस्लीम अल्पसंख्यांक विभाग असून सदर शहरामध्ये उर्दू घर बनविण्याबाबत मोठ्या प्रमाणात मागणी करण्यात येत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्दू घराची उभारणी करण्याकरीता जागा मिळण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित तहसिलदार, महसूल यांना सादर करण्यात आला आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्ताव मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१२-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय, अल्पसंख्याक विभाग दि.०६.०५.२०२२ मधील अटी शर्तीनुसार जागा उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना दि.१५.१२.२०२२ आणि १९.०६.२०२३ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे. मात्र जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नसल्याने याबाबत अद्याप कार्यवाही करणे शक्य झालेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.